महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १७ /२०२५ — दि. ३१ /०१/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोळसेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये टाटा प्रोजेक्ट लि.कंपनी मार्फत Express Freight Railway Consortium Dedicated Freight Corridor Project ( JNPT-Vaitarana Section of Western Corridor Phase -2 ) civil Building and Track Works Contract Package – CTP -11 या प्रोजेक्टचे काम असुन सदरचे काम राज्य महामार्ग क्र.७६ लोढा पलावा एक्सपिरीया मॉल जवळ, कल्याण शिळ रोडवर कल्याण कडुन शिळफाटया कडे जाणाऱ्या वाहीनीवर निळजे ब्रिज या ठिकाणी होणार आहे. सदर कामाचे दरम्यान मुख्य रस्ता पोकलेन मशिनच्या सहाय्याने रस्ता कटींग करुन दुहेरी रेल्वे ट्रॅकचे बांधकाम करणार आहेत. त्या नंतर सदर ठिकाणी १९ प्रि कास्ट बॉक्स मोठया क्रेनच्या सहाय्याने फिटींग करणार आहेत. सदरचे काम दिनांक ०६/०२/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ वा. सुरु करुन ते दिनांक १०/०२/२०२५ रोजी रात्रौ २४:०० वा. समाप्त करणार आहेत. सदर कामा दरम्यान नमद तारखेसकल्याण कडुन शिळफाटयाकडे जाणारा रस्ता निळजे कमान ते लोढा पलावा जक्शंन, महालक्ष्मी हॉटेल दरम्यान वाहतूक मार्गात बदल करुन सदरची वाहतूक शिळफाटयाकडुन कल्याण कडे जाणाऱ्या एकाच वाहीनी वरुन चालु ठेवण्यात येणार आहे. परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद :–** | १) मुंब्रा, कल्याणफाटया कडुन कल्याण कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी व जड अवजड वाहनांना **कल्याण फाटा येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग :–** | सदरची ६ चाकी व जड अवजड वाहने ही कल्याण फाटा – मुंब्रा बायपास – खारेगांव टोलनाक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद :–** | २) कल्याण कडुन मुंब्रा कल्याणफाटया कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी व जड अवजड वाहनांना **काटई चौक (बदलापुर चौक)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग :–** | सदरची ६ चाकी व जड अवजड वाहने ही काटई चौक (बदलापुर चौक) – खोणी नाका – तळोजा एम.आय.डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद :–** | ३) नवी मुंबई तळोजा एम.आय.डी.सी. मार्गे खोणी नाका, निसर्ग हॉटेल येथुन काटई चौक/बदलापुर चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी व जड अवजड वाहनांना **खोणी नाका, निसर्ग हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग :–** | सदरची ६ चाकी व जड अवजड वाहने ही खोणी नाका, निसर्ग हॉटेल येथे उजवे वळण घेवुन बदलापुर पाईपलाईन – नेवळी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद :–** | ४) अंबरनाथ बदलापुर कडुन बदलापुर पाईप लाईन रोडने काटई चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी व जड अवजड वाहनांना **खोणी नाका, निसर्ग हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग :–** | सदरची ६ चाकी व जड अवजड वाहने काटई चौक (बदलापुर चौक) – खोणी नाका – तळोजा एम.आय.डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **हलके वाहने पर्यायी रस्ता** | नवी मुंबई मुंब्रा कल्याण फाटा मार्गे कल्याणच्या दिशेने येणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी कल्याण फाटा – शिळफाटा – दिवा – आगासनफाटा – दिवा संदप रोड – मानपाडा, कल्याण शिळ रोड या मार्गाचा वापर करावा. |
| **हलके वाहने पर्यायी रस्ता** | मुबंई, ठाणे कडुन कल्याणफाटा (मुंब्रा) मार्गे कल्याणचे दिशेने येणाऱ्या कार मोटारसायकल स्वार यांनी नाशिक मुंबई महामार्ग – मानकोली मोटागाव – डोंबिवली या मार्गाचा किंवा नाशिक मुंबई महामार्ग – रांजनोली बायपास – कोनगांव – कल्याण या मार्गाचा वापर करावा. |

CamScanner

| | |
|---|---|
| हलके वाहने पर्यायी रस्ता | कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापुर, उल्हासनगर कडुन नवी मुंबई, मुंबई दिशेने जाणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी नक्की नाका – श्रीमलंग रोड – नेवाळी नाका येथुन उजवीकडे वळुन – बदलापुर पाईपलाईन रोड – खोणी नाका – तळोजा एम.आय.डी.सी. मार्गांचा वापर करावा. |
| हलके वाहने पर्यायी रस्ता | कल्याण, डोंबिवली कडुन ठाणे, मुंबई दिशेने जाणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी डोंबिवली – मोटागाव – मानकोली नाका किंवा दुर्गाडी कोनागाव – नाशिक महामार्गाचा वापर करावा. |

सदरची वाहतूक अधिसूचना **दिनांक ०६/०२/२०२५ रोजी रात्रौ ००:०१ वा. सुरु करुन ते दिनांक १०/०२/२०२५** रोजी **रात्रौ २४:०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
मा. पोलीस आयुक्त, मिरा–भाईंदर वसई–विरार.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ ठाणे, परिमंडळ – २ भिवंडी, परिमंडळ – ३ कल्याण, परिमंडळ – ४ उल्हासनगर, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत :–** आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत :–** मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner